# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

७वामजला, महानगरटेलीफोननिगमबिल्डींगक्र. १,हुतात्मास्मारक चौक, एम.जी. रोड मुंबई-४०० ००१.

दूरध्वनी : ०२२-२२६२१९७८/२२६२१९६८ ई-मेल: dclmms@yahoo.in

दिनांक- २८ जानेवारी, २०२१

## वजन वा माप यांचे पडताळणीकरीता ऑनलाईन अर्जासाठी कार्यपद्धती.

डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडष्ट्रीज अॅड इंटरनल ट्रेड, भारत सरकार यांनी जिल्हा स्तरीय उद्योग सुधारणा कृती योजना ( डी एल बी आर ए पी ) ,२०२०- अंतर्गत निर्धारीत केलेल्या सुधारणा पुर्ततेसाठी, उपयोगकर्त्यांना वजन वा माप यांचे पडताळणी करीता ऑनलाईन अर्जाची सुविधा देण्यात आली आहे. ऑनलाईन अर्जाची कार्यपद्धती खालीलप्रमाणे असेल-

१) वजन वा माप यांचे पडताळणी करीता ऑनलाईन अर्जासाठी उपयोगकर्ता नियमावली पाहण्यासाठी “vaidhmapan.maharashtra.gov.in” या संकेतस्थळाला भेट द्या.

२) योग्य त्या क्रेडेन्शियल द्वारे लॉगिन केल्यानंतर वजन वा माप यांच्या पडताळणी करीता अर्ज करा.

३) वजन वा माप यांच्या पडताळणी/फेरपडताळणी करीता अर्ज प्रात झालेनंतर-

   i) संबधीत निरीक्षक अर्जाची छाननी करेल आणि अर्ज परिपूर्ण असल्याचे आढळून आल्यास, पडताळणीची तारीख व काही सुचना असल्यास सुचनेद्वारे कळवेल.

   ii) जर अर्ज परीपूर्ण नसेल, तर अर्ज रद्द करेल किंवा कागदपत्रे, वजन वा माप यांचा तपशिल, पडताळणी व मुद्रांकन शुल्क याबाबत असलेल्या अर्जातील त्रुटीबाबत कळवेल. त्रुटीच्या पुर्ततेनंतर पडताळणीची तारीख व काही सुचना असल्यास सुचनेद्वारे कळवेल.

   iii) प्राप्त झालेला अर्ज त्यांच्या कार्यक्षेत्रातील नसेल तर, असे अर्ज, अर्जात नमुद केलेल्या कार्यक्षेत्राच्या वैध मापन शास्त्र अधिका-यांकडे वर्ग करता येतील.

४) अर्ज कारणांसह रद्द करता येतील जर,

   अ) प्राप्त अर्ज त्यांच्या कार्यक्षेत्रातील नसेल.

   ब) शुल्क ग्रासद्वारे संबधीत विभागात जमा केलेले नसेल.

   क) जमा केलेले शुल्क हे सादर केलेल्या वजन वा माप यांच्या तपशिलानुसार आणि तसेच वैध मापन शास्त्र अधिका-याने तरतुदीनुसार कळविले असेल त्यापेक्षा कमी असेल.

   ड) अर्ज परीपूर्ण नसेल किंवा क्षेत्रीय निरीक्षकाने कळविलेल्या त्रुटींची अर्जदाराने पुर्तता केली नसेल.

   ई) देण्यात आलेल्या तारखेस वजन वा माप पडताळणीसाठी सादर न केल्यास.

५) पडताळणीचे काम व्यापा-याच्या जागेवर करावयाचे असल्यास अर्जदाराने ३० दिवस आगाऊ अर्ज करावा. जर अर्ज विहीत कालावधीत केला नसेल तर अतिरीक्त शुल्कासाठी वैध मापन शास्त्र अधिकारी जबाबदार असणार नाहीत.

६) अर्जदारास त्यांच्या लॉगिनद्वारे अर्जाची स्थिती पाहता येईल.

(डॉ. रविंद्र कुमार सिंगल)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई .

**Office of Controller Legal Metrology, Maharashtra State,**
7th Floor, Fountain Telecom Building No.1
Hutatma Smarak Chawk, M.G.Road, Mumbai-400 001.
Tel : 022-22621968/22621972/22621978
e-mail : clmms@yahoo.in; dclmms@yahoo.in ;dclmms_complaints@yahoo.com

Date: 28th January, 2021

## Procedure for online application for verification of weight or measure.

In compliance with the mandate of District Level Reform Action Plan (DLRAP) 2020 reforms framed by Department for Promotion of Industry and Internal Trade (DPIIT) Government of India in respect to allow users of weight or measure to apply online for verification of weight or measure. The procedure for online application is as follows-

1) Visit "vaidhmapan.maharashtra.gov.in" to view user manual for online application for verification of weight or measure.

2) After login with valid credential apply for verification of weight or measure.

3) After receipt of the application for verification/re-verification of weight or measure-
   - i) Concern Inspector will scrutinize the application and if he found application is complete in itself- inform the date for verification by notification with instructions required if any.
   - ii) If, the application is not complete in itself, reject the application or inform the discrepancies regarding documents, details of weight or measure, fees for verification and stamping observed in applications. After compliance of queries inform the date for verification by notification with instructions required if any.
   - iii) If, application received is not from his jurisdiction, may refer to the other Legal Metrology Officer having the jurisdiction mentioned in application.

4) Application will be rejected with reason if,
   - a) Application received is not from his jurisdiction.
   - b) Fee is not deposited in respective division through GRAS.
   - c) Fee deposited is less than required as per details of weight or measure submitted and also intimated by Legal Metrology Officer as per provisions if any.
   - d) Application is not complete in itself or applicant not complied queries raised by concerned area Inspector.
   - e) Weight or measure not produced for verification on date given for the same.

5) Applicant should apply 30 days in advance for verification work to be done at trader premises. Legal Metrology Officer will not responsible for additional fees payable if application is not received in specified time.

6) Applicant can track the status of the application through their login.

(Dr. Ravinder Kumar Singal)
Controller of Legal Metrology,
Maharashtra State, Mumbai